नि.दि.दावा कं.१०८/२०१२
भागुबाई व इतर वि. गोजराबाई व इतर
नि.क्र.८२

सदर अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र.१ चे वारसांना दाव्यात सामील करणेकरीता आहे.

०२. अर्ज, म्हणणे, शपथपत्र, दावा व कागदपत्राचे अवलोकन केले.

०३. अर्जातील थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी क्र.१ गोजराबाई पुंजाजी मोरे यांचा दि.१३/०२/२०२२ रोजी मृत्यु झालेला आहे. वारसांना दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. अर्जामध्येच वारसांची नावे नमुद केली आहेत.

०४. प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे की, अर्ज दाखलपात्र नाही. दावा वाटणीचा आहे. त्यामुळे सहभागधारक दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. प्रतिवादी क्र.३ व ६ यापुर्वीच मयत आहेत, त्यांचे वारस दाव्यात सामील केलेले नाहीत. त्यामुळे मयत प्रतिवादीविरोधात दावा कमी झालेला आहे. त्यांच्या गैरहजेरीमध्ये दावा कमी होतो. त्यामुळे दावा दखलपात्र राहत नाही.

०५. प्रतिवादींचे पुढे कथन असे की, न्यायालयाने परवानगी दिलेली नसतांना वादींनी वादपत्रामध्ये मयत प्रतिवादी क्र.३ चे वारस नमुद करुन खोटा दस्त अर्थात फोर्जरी केली आहे. प्रतिवादी क्र.३ व ६ हे मयत असतांना प्रतिवादी क्र.१ गोजराबाईचे वारस म्हणुन त्यांचे वारसांना अशाप्रकारे सामील करता येणार नाही. शेवटी अर्ज नामंजुर करुन वादींविरोधात कारवाई करणेची विनंती केली.

०६. वादीतर्फे युक्तीवाद केला नाही. प्रतिवादींतर्फे श्री जे.आर. कासलीवाल, विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. प्रतिवादी क्र.३ सिताराम व प्रतिवादी क्र.६ गोविंद हे मयत झाले असुन त्यांचे वारसांना दाव्यात सामील करण्याकरीता नि.क्र.७६ वर अर्ज दिलेला असुन त्यावर वारसांना नोटीस काढण्याचा आदेश झालेला आहे. सदर अर्जावर आदेश होण्यापुर्वीच वादींचे विद्वान विधिज्ञ श्री एफ.सी. सोनवणे यांनी नि.क्र.१ वर दुरुस्तीची नोंद केली आहे. अर्ज मुदतीत नसतांना वारसांना नोटीसबाबत आदेश झालेला असतांना अर्जावर दुरुस्ती करणे ही बाब नक्कीच चुकीची व अयोग्य

आहे. याशिवाय दावा अर्थात वादपत्र इंग्रजी भाषेत असुन दुरुस्ती मराठी भाषेत केलेली आहे. सदर बाब अतिशय निष्काळजीपणाची आहे. विनाअधिकारे दुरुस्ती केल्याने संबंधीत विधिज्ञांचा खुलासा मागविणे आवश्यक आहे.

०८. प्रतिवादी क्र.१ गोजराबाई अर्जाप्रमाणे दि.१३/०२/२०२२ रोजी मयत झालेली आहे व सदर अर्ज दि.१४/०३/२०२२ रोजी दिलेला आहे. यावरुन सदर अर्ज मुदतीत आहे. प्रतिवादी क्र.३ व ६ यांचे वारसांना दाव्यात सामील करणेकरीता अर्ज दिलेला असल्याने सदर अर्जानुसार गोजराबाईचे वारसांना दाव्यात सामील न करण्यास कोणतेही कारण नाही. परंतु प्रतिवादी क्र.३ व ६ हे अगोदरच दाव्यात सामील होते व ते मयत झाले आहेत त्यामुळे त्यांचे वारसांना प्रतिवादी क्र.१ चे वारस म्हणुन सामील करण्यास परवानगी देता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये इतर वारसांना सामील करणेकरीता अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे, करिता खालील आदेश.

**आदेश**

अर्ज अंशतः खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

१. अर्जात नमुद वारसांपैकी वारस क्र.३ सितारामचे वारस व वारस क्र.४ गोविंदा यांचे वारस, यांचे व्यतिरिक्त नमुद प्रतिवादी क्र.१ चे वारसांना दाव्यात सामील करणेस परवानगी देण्यात येते.

२. प्रतिवादी क्र.२, ३ व ६ चे वारसांना सामील करणेबाबत न्यायालयाचा आदेश नसतांना वादींचे विधिज्ञ श्री एफ.सी. सोनवणे यांनी विनाअधिकारे वादपत्रात दुरुस्ती का केली याबाबत खुलासा दयावा.

स्वाक्षरीत/—

दि. १३/०९/२०२२

(श.गि. दुबाले)

दि.न्या.क.स्तर, नांदगाव